रयत शिक्षण संस्था, सातारा.

इयत्ता ५ वी | द्वितीय सत्र परीक्षा २०२४ - २५ | गुण - ४०

वेळ २.०० तास | विषय - मराठी | पेजेस - २

१. अ) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. ४

> आमच्या घरी त्या वेळी मातीचीच भांडी असायची सैंपाकाला. मोगा, डेरा, घट, तरळ, टिंगाणी, गाडगी असलं हरघडी लागणारं काय काय असायचं. शेगड्या, चुलीपण मातीच्याच बनायच्या. खेळायला बुंडूकली, पुजायला बैल अन् गणपती, मुखवटे, नक्षीची कमान असलं बरंसचं तिथं तयार व्हायचं.

१) लेखिकेच्या घरी स्वयंपाकासाठी कशापासून बनविलेली भांडी असायची ? १

२) उताऱ्यात मातीपासून बनविलेल्या कोणकोणत्या भांड्यांचा उल्लेख आला आहे ? १

३) खेळण्यासाठी मातीपासून कोणकोणती खेळणी बनविली जायची ? १

४) तुम्हाला माहीत असलेल्या मातीच्या इतर वस्तू लिहा. १

ब) खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. ४

पुस्तकं सांगतात गोष्टी
युगायुगांच्या
माणसांच्या जगाच्या,
वर्तमानाच्या-भूतकाळाच्या.
एकेका क्षणाच्या !
जिंकल्याच्या-हरल्याच्या,
प्रेमाच्या-कटुतेच्या !
तुम्ही नाही का ऐकणार
गोष्टी पुस्तकांच्या ?
पुस्तके काही करू इच्छितात,
तुमच्याजवळ राहू इच्छितात.
पुस्तकांत पाखरं चिवचिवतात.
पुस्तकांत आखरं सळसळतात.
पुस्तकांत निर्झर गुणगुणतात
पुस्तकं परीकथा ऐकवतात.
पुस्तकात रॉकेटचे तंत्र आहे,
पुस्तकात विज्ञानाचा मंत्र आहे.
पुस्तकांची दुनिया न्यारी आहे,
ज्ञानाची उत्तुंग भरारी आहे !
तुम्हांला नाही का जायचं ?
पुस्तकांच्या विश्वात ?
पुस्तकं काही सांगू इच्छितात,
तुमच्या जवळ राहू इच्छितात.

मूळ कवी - सफदर हाश्मी
(अनुवादित)

१) पुस्तकात कोण गुणगुणतात ? १

२) कोणाची दुनिया न्यारी आहे ? १

३) तुमचे पाठ्यपुस्तक चांगल्या अवस्थेत रहावे, यासाठी कोणती काळजी घ्याल ? २

२. अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. २

१) रात्री कोण फिरते? २) वाहनातून निघणाऱ्या धुराने कोणते प्रदूषण होते?

आ) शाहू महाराजांनी दौरा केलेल्या तालुक्यांची नावे - २

१) ................ २) ................ ३) ................

इ) खालील वाक्य कोणत्या पाठातील आहे व ते कोणी कोणास म्हटले आहे ते लिहा. २

"तिच्या शाळेचा खर्च मी बघतो"

पाठाचे नाव - ................ कोणी कोणास म्हटले - ................

ई) कवितेच्या ओळी पूर्ण करा. २

ओढाळ वासरू ................ सोडुनिया

उ) आमश्या डोहल्याला ढोला संबंधी कोणती माहिती होती ? २

अ) ................ आ) ................

३. अ) गटात न बसणारा शब्द ओळखून लिहा. ( कोणतेही २ ) २

१) ओला, गरम, मध, चांगला - २) जातो, खेळतो, रमेश, गातो -

३) शूर, त्याला, आम्हाला, तिचे -

आ) कंसातील क्रियापदाचे योग्य रूप तयार करून वाक्य पूर्ण करा. २

१) मी नेहमी शाळेला ................ ( जाणे )

२) नीताने गाईला चारा ................ ( घालणे )

इ) वचन बदल. १

१) वासरू - ................ २) शेत - ................

ई) विरूद्धार्थी शब्द लिहा. १

१) टवटवीत X ................ २) दिवस X ................

उ) खालील वाक्यातील काळ ओळखा. ( कोणतेही २ ) २

१) आमचा कबड्डीचा संघ जिंकला - २) सतीश आज सिनेमाला जाईल -

३) नीता दररोज शाळेत जाते -

ऊ) खालील वाक्यातील रिकाम्या जागी कंसातील योग्य विशेषणे लिहा. २

( कोणतेही २ ) ( निळेशार, पन्नासावा, नवा )

१) काल बाबांचा .......... वाढदिवस होता.

२) ताईने बाळाला .......... सदरा घातला. ३) नदीचे पाणी........ होते.

४. अ) खालील सूचना फलकाचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ४

> **महावितरण वीज बंद निवेदन**
>
> महावितरण कंपनीच्या, हसे नगर विभागात महत्त्वाच्या दुरूस्तीच्या कामासाठी गुरूवार दिनांक २३/०२/२५ रोजी, हसे नगर परिसरातील वीजपुरवठा बंद राहील. सकाळी १०.०० ते ४.०० मु. पो. हसेवाडी, ता हसेगाव जि. हसे नगर पी. आर. ओ. नं. ४२५/१५ कार्यकारी अभियंता, हसे नगर विभाग

१) वीज बंद निवेदन कोणी दिलेले आहे ? १

२) कोणत्या दिवशी वीजपुरवठा बंद करण्यात येणार आहे ? १

३) कोणत्या भागातील वीजपुरवठा बंद ठेवला जाणार आहे ? १

४) वीजपुरवठा कोणत्या वेळी बंद ठेवला जाणार आहे ? १

ब) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर आठ ते दहा ओळीत निबंध लेखन करा. ४

१) पाणी हेच जीवन २) माझा आवडता पक्षी ३) माझी शाळा

४) स्वच्छतेचे महत्त्व ५) माझा आवडता नेता

क) आपल्या मित्राला किंवा मैत्रिणीला परीक्षेसाठी शुभेच्छा देणारे पत्र लिहा. ४

--किंवा--

क) खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे गोष्ट लिहा.

> एक राजा .......... त्याची प्रजा आळशी होती .......... राजा युक्ती करतो .......... रस्त्यावर मोठा दगड ठेवतो .......... दगडाखाली सोन्याची पिशवी .......... कोणीही उचलत नाही .......... एक गरीब माणूस उचलतो .......... त्याला सोन्याची पिशवी मिळते .......... तो श्रीमंत बनतो .......... इतर प्रजेला ते कळते .......... प्रजा उद्योगी बनते .......... तात्पर्य ..........